# महाराष्ट्र शासन
## जिल्हाधिकारी, कार्यालय लातूर
## सूचना
### लातूर महानगरपालिका लातूर परिधस्त क्षेत्रासाठीचा प्रारुप विकास केन्द्र नकाशा
### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम-२०(३) अन्वये सूचना

**क्रमाकंः-प्रायोला/विकेन**

ज्याअर्थि महाराष्ट्र शासनाने नगर विकासाची अधिसूचना क्रमाकं टीपीएस-३७१६/ प्र.क्र. २६८/२०१६/नवि-३० दिनाकं ०२/०१/२०१८ व्दारे त्यासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद फेरबदलासह लातूर जिल्हाची प्रादेशिक योजना मंजुर केलेली आहे.सदर परिशिष्ट अ अन्वये शासनाने यापुर्वीची अधिसुचना क्र.टीपीएस/३७१५/१५६३/सीआर३००/२०१५/नवि ३० दि.२६/०९/२०१६ ला रदद करुन आदेंश पारीत केले आहेत. की महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-१९६६ (यापुढे उक्त अधिनियम असे उल्लेखिलेले आहे.) चे तरतुदीखाली लातूर महानगरपालिका परिधस्त क्षेत्रासाठी विकास केन्द्र नकाशा तयार करणेत यावा. त्यासाठी सहसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे सहमतीने उक्त अधिनियमाचे कलम-२० अतर्गत कार्यवाही करणेत यावी. लातूर महापालिका परिधस्त क्षेत्रासाठीच्या विकास केन्द्र नकाशा बाबत उक्त अधिनिमाचे कलम-२० (३) अन्वये नोटीस प्रसिध्द करणे व कलम२० (४) अन्वये त्यास अंतिम मंजुरी देणे याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थि विकास केन्द्र नकाशा अतर्गत लातूर महानगरपालिका परिधस्त क्षेत्रातील ४० गावाचा समावेश होत असून त्याचे एकुण क्षेत्र २७,३३३ हे आर आहे सदर सपूर्ण क्षेत्राचा अस्तिवातील भुवापंर नकाशा हा भौगोलिक माहीती प्रणाली (GIS) च्या माध्यमातून करण्यात आलेला आहे. यानुसार लातूर महापालिका परिधस्त क्षेत्रासाठी प्रारुप विकास केन्द्र नकाशा व त्याचा अहवाल तयार करण्यात आलेला असून त्यास सहसंचालक, नगर रचना औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी मान्यता दिलेली आहे.

आता त्याअर्थी याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम-२० (३) अन्वये लातूर महानगरपालिका परिधस्त क्षेत्राच्या प्रारुप विकास केन्द्र नकाशाबाबत नागरीकाकडुन हरकती व सूचना योग्य त्या कारणासह ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाचे मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहेत.

//निमिडो//

हरकती व / सूचना उपसंचालक, नगर रचना, लातूर प्रादेशिक योजना कार्यालय, पांगळ निवास, विशालनगर बार्शी रोड, लातूर -४१३५१२ यांच्याकडे पाठविण्यात याव्यात  लातूर महानगरपालिका परिधस्त क्षेत्राचा प्रारुप विकास केन्द्र नकाशा व त्याचा अहवाल नागरीकांच्या अवलोकनार्थ त्याचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.लातूर माहापालिका परिधस्त क्षेत्राचा प्रारुप विकास केन्द्र नकाशा व त्याचा अहवाल हे डाऊनलोडसाठी www.latur.gov.in वर सुधा उपलब्ध आहेत.

ठिकाण:- लातूर

दि.२३/०७/२०१९

(जी. श्रीकांत IAS)
जिल्हाधिकारी, लातूर

जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय लातूर

//निमिडो//